| MHLA150009212017 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | २७/११/२०१७ |
| | नोंदणी दिनांक | : | २७/११/२०१७ |
| | निकाल दिनांक | : | २५/०६/२०२६ |
| | कालावधी | : | ०८व. ०६म. २८ दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही. एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **संक्षीप्त फौजदारी खटला क्र. २२०/२०१७**<br>नि.क्र. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी. एस. भराडीया |
| आरोपी | | अंगद एकनाथ केदार,<br>वय – ५२ वर्ष, धंदा – चालक,<br>रा. राजेवाडी, ता.चाकूर जि.लातूर |
| आरोपीचे विधीज्ञ | | श्री. आर.आर. मोरगे |

**भाग – ब**

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०८/०८/२०१७ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १२/०८/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २७/११/२०१७ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | १२/०३/२०२० |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२/०३/२०२० |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २५/०६/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | --- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अंगद एकनाथ केदार | १८/०८/२०१७ | १८/०८/२०१७ | भा.दं.वि कलम २७९, ३३७ नुसार. | दोषमुक्त. | - | - |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.**

**-अभियोगपक्ष -**

| **अनु.क्र.** | **नांव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | लक्ष्मण इरप्पा सुरवसे | फिर्यादी |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | आनंद कैलास कांबळे | तपास अधिकारी |

ब- **-बचावपक्षाचे साक्षीदार -**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | - |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | – |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १ | नि.क्र.३ | प्रथम खबर अहवाल |
| २ | नि.क्र. १६ | फिर्याद |
| ३ | नि.क्र. ३१ | घटनास्थळ पंचनामा |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| **अनु.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**इ. –भौतिक वस्तु–**

| **अनु.क्र.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## – न्यायनिर्णय –

(पारीत दि.२५.०६.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

दि.०८.०८.२०१७ रोजी ०७.०० वा. मौजे कवठाळी येथे फिर्यादी लक्ष्मण इरप्पा सुरवसे यांची आत्या मयत झाल्याने ते व त्यांची पत्नी हेमा त्यांची गाडी होंडा ॲक्टीव्हा क्र.एम.एच.२४–ए.इ.–२१५५ वर मौजे कवठाळी येथे अंत्यविधी करीता गेले होते. परत येत असतांना दुपारी ०२.३० वा. ते शिवणखेड मोडवर आले असता वळण रस्त्यावर बस क्र. एमएच.२० बी.एल.११५६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील बस ही हयगय व निष्काळजीपणाने भरधाव वेगात वळण रस्त्यावर वळविले असता फिर्यादीच्या गाडीला धडक दिली, त्यामुळे फिर्यादी व त्यांची पत्नी जखमी झाले. तसेच अपघातामध्ये ॲक्टीव्हाचे २५ ते ३० हजार रुपयांचे नुकसान झाले. उपचारानंतर फिर्यादीने आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली.

३. त्या अनुषंगाने चाकूर पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७ चा गुन्हा गु.र.क्र. २४८/२०१७ अन्वये नोंद झाला. तपासी अधिकारी ए.के.कांबळे, पोना.बं.नं.१२९२ पो.स्टे. चाकूर, यांनी सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान घटनास्थळाला भेट देवुन घटनास्थळ पंचनामा व वाहनाचा पहाणी पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, आरोपीस अटक करुन अटकेचा पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. मा. पूर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.१५ वर आरोपीविरुध्द भा.दं.वि.कलम २७९, ३३७ नुसार दोषारोपाचा तपशिल नोंदविला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले.

५. नि.क्र.१ वरील दि. ०५/०२/२०२६ रोजीच्या आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. त्यानंतर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र. ३२ वर नोंदवले. आरोपीने त्यांच्या विरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

६. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.०८.०८.२०१७ रोजी १४.३० वा. च्या सुमारास गांजूर शिवारात शिवणखेड मोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील बस क्र.एम.एच.२०–बी.एल.–११५६ ही भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे चालवली जेणेकरुन मानवी जिवीतास धोका होईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोहचण्याचा संभव असेल व त्याद्वारे भा.द.वि. चे कलम २७९ नुसार गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| २. | उपरोक्त नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमुद वाहन निष्काळजीपणाने व हयगयीने चालवून फिर्यादीचे वाहन होंडा ॲक्टीव्हा क्र.एम.एच.२४–ए.इ.–२१५५ ला धडक दिली, त्यामुळे फिर्यादी व त्यांची पत्नी जखमी होण्यास कारणीभूत झाले, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ...नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## का र ण मि मां सा

### मुद्दे क्र. १ ते ४ बाबत –

७. सदरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्या कारणाने त्यांचे निष्कर्ष एकत्रीत नोंदवण्याचे ठरवले.

८. साक्षीदार क्र. १ लक्ष्मण इरप्पा सुरवसे यांच्या पुराव्यात असे आले की, घटना दि. ०८.०८.२०१७ रोजी दु. ०२.२० वा. शिवनखेड मोड या ठिकाणी घडली. घटनेच्या दिवशी ते त्यांच्या ॲक्टीव्हा गाडीने आत्या वारली म्हणून ते पत्नीसह गेले होते. ते पत्नीसह अंत्यविधीहून परत येत असतांना

शिवनखेड मोड या ठिकाणी एक बस चुकीच्य दिशेने आली. ते थांबलेले असतांनाही बसच्या खाली त्यांची ॲक्टीव्हा गाडी गेली. त्यामुळे ते व त्यांची पत्नी खाली पडले. त्यामुळे त्यांच्या हाताला मार लागला व ॲक्टीव्हा गाडीचे नुकसान झाले. मेव्हण्याने येऊन त्यांना लातूरच्या दवाखान्यात उपचारासाठी नेले. त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद नि.क्र. १६ दिली, त्यातील मजकूर बरोबर असून त्यावर त्यांची सही आहे. ज्या बसने धडक दिली त्या बसचा क्र. एम.एच.–२०–बी–११५६ असा आहे.

९. फिर्यादीने त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले की, शिवनखेडला जाणारा रस्ता हारेणापूर ते आष्टामोड या रस्त्याला मिळालेला आहे व तो थोडा खराब रस्ता आहे, तो रस्ता खराब असल्यामुळे वाहने सावकाश चालवावे लागते. त्यांनी फिर्याद मध्ये बस खाली गेल्याचे पोलीसांना सांगितले होते. परंतू ती बाब त्यांच्या फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण त्यांना सांगता येत नाही. तसेच पोलीसांना फिर्याद देतांना हाताला मार लागल्याचे सांगितले होते, त्यांचा मेव्हणा येऊन त्याने त्यांना उपचारासाठी घेऊन गेले होते, असे सांगितले होते, परंतू सदर बाबी या त्यांच्या फिर्यादमध्ये का नमुद नाहीत याचे कारण त्यांना सांगता येत नाही.

१०. साक्षीदार क्र. २ आनंद कैलास कांबळे, तपास अधिकारी यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दि.१२.०८.२०१७ रोजी त्यांच्या गुरक्र २४८/२०१७ चा तपास त्यांच्याकडे आला. त्यांनी दि. १२.०८.२०१७ रोजी १९.०० ते १९.३० च्या सुमारास दोन पंचासमक्ष आष्टा ते रेणापूर रोडवर शिवणखेड पाटी येथे घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ३१ केला, त्यावर त्यांची व दोन पंचाच्या सहया आहेत, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तपासामध्ये त्यांनी साक्षीदारांचे जाब जबाब नोंदविले. जखमेचे प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यांच्या तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, आरोपीने त्याची गाडी भरधाव वेगात चालवून

फिर्यादी चालवित असलेल्या ॲक्टीव्हा गाडीला समोरुन जोराची धडक दिली होती, त्यामुळे फिर्यादी जखमी झाले. आरोपीच्या गाडीचा क्र.एम.एच.२०–बी.एल.–११५६ असा होता. सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये आरोपीला मदत होईल असे कांही निष्पन्न झाले नाही.

११. अभियोगपक्षाला वारंवार संधी देऊन देखील इतर महत्वाचे साक्षीदार तसेच फिर्यादीची पत्नी जखमी साक्षीदार यांना साक्षी कामी न्यायालयात हजर केले नाही, परिणामी नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. एकंदरीत अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन अपघातातील गाडी ही आरोपी हयगयीने व निष्काळजीपणे चालवित होते ही बाब सिध्द होत नाही. फिर्यादीच्या पुराव्यातील आलेली विसंगती तसेच उलटतपासामध्ये मान्य केलेल्या बाबीवरुन घटनेच्या वेळी रस्ता हा खराब होता व वाहने सावकाश जात होते तर आरोपीची हयगय व निष्काळजीपणा होता याबाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे आरोपी विरुध्दचे आरोप सिध्द होत नाहीत. एकंदरीत आरोपीविरुध्द संशयापलिकडचा पुरावा सादर करण्यास अभियोगपक्ष असफल ठरलेला आहे. त्यामुळे मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>** –

१२. मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी आलेले आहेत. घटनेतील वाहने हे जप्त करण्यात आले होते याबाबत कोणतेही कथन नाही तसेच दोषारोपपत्रा मध्ये मुददेमालाचे वर्णन रिक्त ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे अपघाततील गाडीबाबत कोणताही आदेश करण्यात येत नाही. म्हणून खालीप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी अंगद एकनाथ केदार, यांना भारतीय दंड संहिता कलम १८६० |

| | |
|---|---|
| | चे कलम २७९,३३७ च्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीने पुर्वीचे दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |
| ३. | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.06.25 16:05:04 +0530

दिनांक – २५.०६.२०२६

(व्ही. एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | M.B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 25/06/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 25/06/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 25/06/2026 |